आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ फेब्रुवारी २०२६ -रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेच्या सभापतींविरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात होणार

- सेंट्रल बँक डिजीटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- महाशिवरात्रीनिमित्त राज्यातल्या शिवमंदिरांमधे अलोट गर्दी

- दहशतवादविरोधी पथकाचे यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यात वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापे

**आणि**

- टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत कोलंबो इथं होत असलेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून पाकिस्तानचं भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रण

**<><><><><>**

लोकसभेचं कामकाज सुट्टीनंतर ९ मार्चला पुन्हा सुरू झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांच्या विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान घेतली जाईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजु यांनी वृत्तसंस्थेला दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्चला सुरु होईल, या टप्प्यात काही विधेयकं चर्चेला येतील, यात एक महत्त्वाचं विधेयक आहे, असं त्यांनी सांगितलं. पहिल्याच दिवशी ९ मार्चला सभापतीं विरोधातल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होईल आणि त्यानंतर मतदान होईल, असं रिजिजु म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज गुजरातमधे गांधीनगर इथं CBDC अर्थात केंद्रिय बँक डिजिटल चलन आधारित सार्वजनिक वितरण प्रणालीचं उद्घाटन केलं. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयातला भ्रष्टाचार यामुळे संपुष्टात येईल असा विश्वास यावेळी शहा यांनी व्यक्त केला. यापूर्वी नक्षलग्रस्त किंवा संघर्षग्रस्त भागात पाच किलो अन्नही गरिबापर्यंत पोहचत नसे, मात्र या प्रणालीचं डिजिटायजेशन झाल्यामुळे आता त्यांच्यापर्यंत अन्न पोहोचणं सुलभ होईल, असंही ते म्हणाले…

**होल्ड बाईट शहा (१९ सेकंद)**

**<><><><><>**

महाशिवरात्रीचा उत्सव आज सर्वत्र भक्तीभावाने साजरा होत आहे. राज्यातल्या बारा ज्योतिर्लिंगांच्या ठिकाणांसह प्रमुख पुरातन शिव मंदीरात पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. नाशिक जवळ त्र्यंबकेश्वर, बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ, वेरुळचं घृष्णेश्वर तसंच हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ, या १२ ज्योतिर्लिंगांमधे गणना होणाऱ्या शिवमंदिरांमधे देशाच्या कानाकोपऱ्यातून तसंच परदेशातूनही दर्शनासाठी आलेल्या भाविकांची प्रचंड गर्दी होती. मंदिर प्रशासन, तसंच स्वयंसेवी संस्थांनी यात्रेकरूंसाठी पाणी, स्वच्छता आणि वाहतुकीच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या होत्या. अनेक ठिकाणी मंत्री, अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी महादेवाचं दर्शन घेऊन पूजा केली. परळी वैजनाथ इथं पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दर्शन घेऊन पूजा केली. राज्यात ठिकठिकाणच्या शिवमंदिरांमधे महाशिवरात्रीनिमित्त अलोट गर्दी झाल्याच्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत. त्र्यंबकेश्वर मंदिर देवस्थानने मंदिर २४ तास खुलं ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यात कुणकेश्वर इथं पालकमंत्री नितेश राणे यांनी दर्शन घेऊन पूजा केली. मंदिर परिसराच्या विकासाकरता आणि सोयी सुविधांसाठी अदिकाधिक निधी देण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

**मुंबईच्या** बाबुलनाथ मंदिरात नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी महापूजा केली. **ठाण्याचं** कौपिनेश्वर आणि अंबरनाथचं शिलाहार कालीन शिवमंदिर, पुण्यात ओंकारेश्वर, संगमेश्वर, मृत्युंजयेश्वर मंदिर, अशा विविध शिव मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात आज सकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. मात्र दुरुस्तीच्या कामामुळे मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद होतं. **नागपूरचं** कल्याणेश्वर शिव मंदिर, गडचिरोलीतलं मार्कंडादेव, गोंदिया जवळ नागराधाम पंचमुखी मंदिर, **छत्रपती संभाजीनगर** मधलं खडकेश्वर मंदीर, **लातूर** शहराचं ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर आणि रत्नेश्वर मंदिर, अशा विविध मंदिरांमधे महाशिवरात्री उत्सवानिमित्त पूजा, अभिषेक, हवन, शोभायात्रा असे कार्यक्रम होत आहेत.

राज्यात गावोगावी महाशिवरात्रीनिमित्त जत्रा भरल्या आहेत. कृषी विभाग आणि राज्य बागायतदार संघटनेच्या वतीनं सांगलीत फळ महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव तालुक्यात प्रतापगड इथं २१ फुटी शिवमूर्ती असून दुसऱ्या बाजूला ख्वाजा उस्मान गनी हारुनी यांच्या दर्ग्याची आणि महाशिवरात्रीची यात्रा एकाच वेळी होत आहे.

**<><><><><>**

उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ञांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती करण्यात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचं विद्यापीठ अनुदान आयोगानं म्हटलं आहे. या क्रमवारीत तमिळनाडू पहिल्या क्रमांकावर असून गुजरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात समन्वय साधण्यासाठी आणि

विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यं आत्मसात करता यावीत यासाठी उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योग तज्ज्ञांची नेमणूक करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगानं २०२२ मधे मार्गदर्शक तत्वं जारी केली होती. ही नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असेल असंही यात सांगितलं होतं. त्यानुसार देशभरात अशा १ हजार ८४१ नेमणुका झाल्या. यातल्या तमिळनाडूत ३४५, महाराष्ट्रात १९३, गुजरातमधे १७९ आणि कर्नाटकमधे १७० नेमणुका झाल्या आहेत.

<><><><><>

दहशतवादाशी संबंधित कारवायांप्रकरणी महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकानं आज यवतमाळ आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांमध्ये वीसपेक्षा जास्त ठिकाणी छापेमारी केली, आणि काही संशयितांना ताब्यात घेतलं. यवतमाळम जिल्ह्यात पुसद आणि उमरखेड इथल्या १४ ठिकाणी शोधमोहिम राबवून आक्षेपार्ह कागदपत्रं, मोबाईल फोन आणि विद्युत उपकरणं जप्त केली. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ठिकाणी दहशतवादविरोधी पथकानं छापे टाकले आणि आक्षेपार्ह वस्तू जप्त केल्या. संशयितांची चौकशी सुरू आहे.

<><><><><>

शहरांच्या विकासाकरता एक लाख कोटी रुपयांच्या यूसीएफ- अर्बन चॅलेंज फंडाला मंजुरी देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वागत केलं आहे. उच्च दर्जाच्या शहरी पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी या फंडातून निधी उपलब्ध करून दिला जाईल, यामुळे शहरं देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका निभावतील असं प्रधानमंत्री म्हणाले. यूसीएफ ही गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्रालयाची योजना आहे, सर्वसमावेशक, काटक, विधायक आणि पर्यावरणाला अनुकूल शहरांची उभारणी

करणं हे याचं उद्दिष्ट आहे. या योजनेमुळे पुढल्या पाच वर्षांत शहरी भागात चार लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.

<><><><><>

मराठी भाषेतली पुस्तकं अन्य भाषांमध्ये अनुवादित करण्यासाठी अनुवाद अकादमीची स्थापना करण्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीत केली. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या सत्कार सोहळ्यात काल ते बोलत होते. परदेशातल्या मराठी नागरिकांच्या पुढच्या पिढीसाठी मराठी शिकवणारा ऑनलाईन कोर्स, कवी केशवसुत स्मारकाचं अत्याधुनिकीकरण अशा घोषणाही सामंत यांनी केल्या.

<><><><><>

थोर समाजसुधारक, बंजारा समाजाचं आराध्य दैवत, श्री संत सेवालाल महाराज यांची आज जयंती. राज्यभरात यानिमित्त विविध धार्मिक-सांस्कृतीक कार्यक्रम होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मुंबई इथं त्यांच्या शासकीय निवासस्थानी सकाळी सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

नवी दिल्लीत महाराष्ट्र परिचय केंद्रातही संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

<><><><><>

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज अ गटात भारत-पाकिस्तान यांच्यातली लढत श्रीलंकेत कोलंबो इथं होत आहे. पाकिस्ताननं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २ षटकात १ बाद १६ धावा झाल्या होत्या.

दोन्ही संघांनी आपापले पहिले २ सामने जिंकून प्रत्येकी ४ गुण मिळवले आहेत. आजच्या लढतीतल्या यशापयशावर त्यांचं उपान्त्य फेरीतलं स्थान ठरेल.

क गटात मुंबईच्या वानखेडे मैदानावर झालेल्या सामन्यात वेस्ट इंडीजनं नेपाळवर ९ गडी आणि २८ चेंडू राखून विजय मिळवला. नेपाळनं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून १३३ धावा केल्या. वेस्ट इंडीजनं एक गडी गमावून १५ षटकं आणि २ चेंडूतच ही धावसंख्या पार केली.

अ गटात चेन्नई इथं झालेल्या सामन्यात अमेरिकेनं नामिबियावर ३१ धावांनी विजय मिळवला. अमेरिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४ गड्यांच्या मोबदल्यात १९९ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना, नामीबियाला ६ गडी गमावून १६८ धावाच करता आल्या.

<><><><><>

राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे घेण्यात येणारं चौथं विश्व मराठी संमेलन येत्या २७ तारखेपासून नाशिक इथं होणार आहे. ३ दिवस चालणाऱ्या या संमेलनाच्या मुख्य दालनाला कवी कुसुमाग्रज नगरी असं नाव द्यायचा निर्णय झाला आहे. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज संमेलनाच्या तयारीचा आढावा घेतला. या संमेलनाच्या उद्धाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार उपस्थित राहणार आहेत, असं त्यांनी सांगितलं.

//<><><><><>//